## तिथं... फक्त मृत्यूचाच मृत्यू होतो!

''अशी व्यक्ती कधीच मरत नाही. ती जगते, ती उठते
तिच्यासमोर मृत्यूच मरतो, ती व्यक्ती नाही

प्रत्येकाच्याच वाट्याला छोटीमोठी कामं असतात,
नशिबानंच त्याला ती दिलेली असतात;

पण जो वैश्विक जिणं जगतो आणि वैयक्तिक जीवनाचा
त्याग करतो, तो मृत्यूनंतरही जिवंतच राहतो.

विचित्र जगाचं अवजड ओझं जो स्वत:च्या पाठीवर घेतो,
... आणि वाहूनही नेतो.

ती दु:खही जो आनंदानं भोगतो, तो जरी माणसाचं
नशीब भोगत असला, तरी तो कसा बरं मरेल?

मृत्यूचा त्याच्याशी काहीही संबंध नसतो,
त्याची सत्ता त्याच्यावर चालत नाही हे दिसल्यावर,
त्यानं मृत्यूनंतरच्या अनंत काळाला एका छोट्याशा
तासातच बंदिस्त केलं... आणि त्याला मृत्यू आलाच नाही.

तासभर शोधाशोध केल्यावरही तो सापडला नाही
एका तासाच्या कालावधीतही!

मग आता त्याच्यावरच नजरा रोखा
आणि त्याचा 'मृत्युहीन' चेहरा पाहा.

सर्व माणसांच्या डोळ्यांतून वाहणाऱ्या
आणि समृतिगंधानं दरवळणाऱ्या वसंतवाऱ्यांतून

भूतकाळातील प्रत्येक गोष्टीला
त्याच्या आयुष्याच्या तेजानंच व्यापल्याचं दिसतं...
मग तिथं... फक्त मृत्यूचाच मृत्यू होतो!''

– अल्जरनॉन सी. स्विनबर्न



UGC Care Listed Journal ISSN-0976-5425


मराठवाडा इतिहास परिषद, औरंगाबाद

# History Research Journal

Issue - XXVII

# इतिहास संशोधन पत्रिका

अंक सत्ताविसावा



कार्यकारी संपादक
डॉ. सोमनाथ रोडे

UGC Care Listed Journal

मराठवाडा इतिहास परिषद,
औरंगाबाद
(रजि.नं. एफ ८२० / दि. २६.०८.१९८२)

ISSN : 0976 – 5425

# History Research Journal

# इतिहास संशोधन पत्रिका

**Issue. - XXVII** **January**
अंक - सत्तावीस 2022

कार्यकारी संपादक

**डॉ. सोमनाथ रोडे**

: संपादकीय मंडळ :

डॉ. जाकेर पठाण  प्रा. विजय पांडे
डॉ. सुभाष बेंजलवार  डॉ. नारायण सूर्यवंशी
डॉ. प्रभाकर मिरकड  डॉ. विनोद बोरसे
डॉ. बब्रुवान मोरे

या अंकात व्यक्त केलेली विचार-मते ही मराठवाडा इतिहास परिषद, औरंगाबाद अथवा संपादक किंवा संपादक मंडळ यांची अधिकृत मते नाहीत. त्यांच्याशी ते सहमत असतीलच असे नाही.

UGC Care Listed Journal

**History Research Journal**

**इतिहास संशोधन पत्रिका**

**Issue. - XXVII January**

अंक - सत्तावीस **2022**

**ISSN : 0976 – 5425**

☼ **प्रकाशक :**

**प्रा. विजय पांडे**

सचिव, मराठवाडा इतिहास परिषद

श्री संत सावता माळी महाविद्यालय, फुलंब्री

जि. औरंगाबाद भ्रमणध्वनी - ९४२२७ २३२७७

☼ **मराठवाडा इतिहास परिषद, औरंगाबाद**

☼ **संपर्क :**

**प्राचार्य डॉ. सोमनाथ रोडे**

कार्यकारी संपादक

४ - शारदानगर, अंबाजोगाई रोड, लातूर

पीन : ४१३ ५३१ फोन : ०२३८२ - २२८०९०.

भ्रमणध्वनी : ९४२१४ ८३६११, ७५१७९ ८५६९०

☼ **मुखपृष्ठ छायाचित्रे -** डॉ. प्रविण चव्हाण,सिल्लोड,औरंगाबाद

☼ **मूल्य : रु. २००/-**

पंचवार्षिक वर्गणी रु. १,०००/-

दशवार्षिक वर्गणी रु. २,०००/-

☼ **प्रकाशन दि. ०७ जानेवारी २०२२**

☼ **अक्षर जुळवणी व मुद्रक :**

**विद्याभारती प्रकाशन**

गुजराती शाळेजवळ, मेन रोड,

लातूर - ४१३ ५१२

The publication of the MSS/ Journals/Proceedings- financially supported by the Indian Council of Historical Research and the responsibility for the facts, stated, options expressed and conclusion researched is entirely that of the author/ authors of the articles and the Indian Council of Historical Research accepts no responsibility for them.

# ● भूमिका ●

मराठवाडा इतिहास परिषद, औरंगाबाद ही राज्यभरातील इतिहास प्राध्यापक, अभ्यासक, संशोधक आणि विद्यार्थ्यांचे कृतिशील व्यासपीठ म्हणून इ. स. १९८० पासून कार्यरत आहे. इतिहास विषयात नवीन साधनांद्वारा मांडणी, लिखाण, संशोधन उपलब्ध करून देण्याचे काम परिषदेच्या व्यासपीठावरुन झाले आहे. मान्यवर संशोधक, अभ्यासक आणि इतिहासकारांनी अधिवेशनाच्या माध्यमातून मार्गदर्शन करण्याचे कार्य सातत्याने केले आहे.

संशोधनपर शोधनिबंध परिषदेने नियमितपणे प्रकाशित केले आहेत. इ.स. १९८५ ला 'निवडक शोधनिबंध' या शीर्षकाने अंकाचे प्रकाशन झाले. मात्र इ. स. १९९७ पासून परिषदेने 'इतिहास संशोधन पत्रिका' - 'History Research Journal' या नावाने शोधनिबंध प्रकाशित केले आहेत. अध्यक्षीय भाषण, सत्राध्यक्षांची भाषणे ही संशोधन पत्रिकेतून प्रकाशित करण्यात येत आहेत. १४ जून २०१९ पासून इतिहास संशोधन पत्रिकेचा समावेश 'UGC Care Listed Journal' मध्ये झालेला आहे ही अत्यंत आनंदाची बाब आहे. परिषदेच्या व्यासपीठावरून उत्कृष्ट शोधनिबंध सादर व्हावेत म्हणून परिषदेच्या वतीने तिन्ही विभागांतून उत्कृष्ट शोधनिबंधाला रोख रु. १५०० व प्रमाणपत्राचे पारितोषिक ३७ व्या अधिवेशनापासून देण्यास सुरुवात केली आहे. इतिहास संशोधन पत्रिका प्रकाशित करण्यामागची भूमिका स्थानिक संशोधन प्रकाशित व्हावे, नवीन संशोधकांना प्रकाशनासाठी संधी प्राप्त व्हावी आणि संशोधनासंदर्भात मार्गदर्शन आणि प्रेरणा मिळाव्यात अशी आहे. परिषदेच्या विचारपीठावरुन आतापर्यंत सुमारे १७०० शोधनिबंध सादर झाले. त्यांपैकी परिषदेने ८०० शोधनिबंध प्रकाशित केले आहेत. प्रकाशनाची जबाबदारी संपादक मंडळ, इतिहास संशोधन पत्रिकेचे स्थायी सभासद, वर्गणीदार, वाचक, परिषदेचे आजीव सदस्य (१५२) व वार्षिक सदस्य आणि सातत्याने मौलिक आर्थिक साहाय्यता देणारी 'भारतीय इतिहास अनुसंधान परिषद, नवी दिल्ली' (आयसीएचआर) यांनी उचललेली आहे. त्याबद्दल सर्वांचे मनःपूर्वक आभार! सत्ताविसाव्या अंकाचे वाचक स्वागत करतील ही अपेक्षा. मराठवाडा इतिहास परिषद कार्यकारिणी संपादक मंडळाने घेतलेल्या परिश्रमाबद्दल त्यांचे अभिनंदन करते. मराठवाडा इतिहास परिषदेने चार दशकांचा काळ यशस्वीरीत्या पूर्ण केला आहे. आतापर्यंत परिषदेने २७ 'इतिहास संशोधन पत्रिका' इतिहासाच्या अभ्यासकांसमोर सादर केल्या याचे मनोमन समाधान वाटते. आपणा सर्वांच्या सदिच्छेच्या बळावर परिषदेची भावी वाटचाल गतिमान होईल, असा आम्हास विश्वास वाटतो.

**प्रा. विजय पांडे**
सचिव

**डॉ. जाकेर पठाण**
अध्यक्ष

**सर्व सदस्य**

**मराठवाडा इतिहास परिषद, औरंगाबाद**

मराठवाडा इतिहास परिषद, औरंगाबादच्या 'इतिहास संशोधन पत्रिकेची रक्कम ONLINE / RTGS / NEFTद्वारे पाठविण्यासाठी बँक खात्याचा तपशील :

| | | |
|---|---|---|
| 1) खात्याचे नाव | : | मराठवाडा इतिहास परिषद, सोनवणे कॉम्प्लेक्स, मेन रोड, लातूर |
| 2) बँकेचे नाव | : | बँक ऑफ महाराष्ट्र, मेन ब्रँच, लातूर |
| 3) खाते नंबर | : | 20050377241 |
| 4) खाते प्रकार | : | सेव्हिंग |
| 5) IFSC कोड | : | MAHB 0000038 |

"कोणताही देश युद्ध झाल्याशिवाय खऱ्या अर्थाने जन्माला येऊ शकत नाही. आणि कोणताही आत्मजागृत समाज जागतिक रंगमंचावर एक स्वतंत्र व सार्वभौम राष्ट्र म्हणून सशस्त्र लढ्याशिवाय किंवा सशस्त्र लढ्याची भीती असल्याशिवाय टिकाव धरू शकत नाही."

- मायकेल हावर्ड



# अनुक्रमणिका


| अ.क्र. | लेखक | पृष्ठांक | शिर्षक |
|---|---|---|---|
| | **प्राचीन विभाग** | | |
| १. | Shri. Ravi Dinkar Khillare | १५ | The Significant Role of Third Buddhist Council for the Propagation Buddhism in the Deccan |
| २. | डॉ. अतुल नारायण खोटे | २५ | प्राचीन भारत आणि भारतीय लोकसभेची निर्मिती प्रक्रिया |
| ३. | डॉ. विजय सरडे | ३३ | तीर्थ बुद्रुक येथील सातवाहनकालीन पुरावशेष |
| ४. | श्री. कृष्णा त्रिंबक गुडदे | ४० | धर्मापुरी शिलालेख |
| ५. | डॉ. ज्योती रामराव रामोड | ४४ | प्राचीन काळातील आदिवासींचे धार्मिक जीवन |
| ६. | श्रीमती सुवर्णरेखा देवधर, डॉ. मंजिरी भालेराव | ५० | मत्स्य, कूर्म व वराह ही ब्रह्मदेवाचीच रूपे : एक अभ्यास |
| ७. | डॉ. नारायण सूर्यवंशी | ५७ | लत्तलूरपूरचे राष्ट्रकुट : एक शोध |
| | **गोषवारा** | | |
| १. | डॉ. शीला स्वामी | ६२ | अचलेर येथील शिवालये |
| २. | श्रीमती नेहा वामनराव मोरतळे | ६५ | ऐतिहासिक काळातील आभूषणे : एक अभ्यास |
| ३. | डॉ. संजय कुमार सिंह | ६८ | मूर्तिकला में गणेश की प्रतीकात्मक अभिव्यक्तियाँ |

(६) Griffith R.T., Hymns of Rigveda, E.J. Lazarus and Co. Benares, 1896, P. 476.

(७) Eggling, Julius, Satapatha Brahmana, Part-5, Clarendon Press Oxford, 1900, P. 451.

(८) सातवळेकर, श्रीपाद दामोदर, तैतिरीय संहिता, वसंत श्रीपाद सामवलेकर, सातारा, १९४५, पृ. ३३९.

(९) शर्मा द्वारकाप्रसाद, श्री वाल्मीकी रामायण, रामनारायण लाल पब्लिशर्स इलाहाबाद, १९४५, पृ. १०५५.

(१०) Tagare G.V., Vayupurana, Part -1, Motilal Ban arasidass, Delhi, P. 42-44.

(११) प्रभू अ. ज. (संपा.), मनुस्मृती विदर्भ मराठवाडा बुक कंपनी, २००३, पृ. २८.

(१२) Deshpande N. A., Padma Purana Motilal Banarasidass, Delhi, 1988, P. 6.

(१३) Ibid, P. 6.

(१४) राशिवडेकर, भानू, दातार, उपरोक्त, पृ. ४४०.

(१५) Dutt. M. N., Vishnupuranam C. Dass, Calcutta, 1896, P.

ooo

"वाचनामुळे ज्ञानाची कक्षा वाढते, संभाषणामुळे चातुर्य प्रकट होते. लेखनामुळे विवेचनात नेमकेपणा आणि अचूकता येते."

\- बेकन



(७)

# लत्तलूरपूरचे राष्ट्रकुट : एक शोध

डॉ. नारायण सूर्यवंशी
शिवनेरी महाविद्यालय, शिरूर अनंतपाळ, जि. लातूर

बदामीच्या चालुक्यानंतर त्याचा सामंत दंतीदुर्ग याने राष्ट्रकुट घराण्याची स्थापना केली. वेरूळ येथील क्र. १५ च्या दशावतार लेणीत असलेल्या शिलालेखातून राष्ट्रकुट राज्याचा पहिला राजा दंतीदुर्ग यांची वंशावळ नोंदविलेली आढळते. राष्ट्रकुट घराण्याचा संस्थापक दंतीदुर्ग समजला जातो. नवीन संशोधनाच्या आधारे दंतीदुर्गच्याही आधी दोन पिढ्यांचे राज्य वेरूळ परिसरावर होते. त्यांचा इतिहास मात्र स्पष्ट होत नाही. राष्ट्रकुटांच्या सर्व शाखांचे मूलस्थान हे लातूर असल्याचे उल्लेख मिळतात. या राष्ट्रकुटांचा कालखंड इ.स. ७५३ ते इ.स. ९७५ असा आहे. यांनी महाराष्ट्र व त्या लगतच्या सलग प्रदेशावर राज्य केले. त्यांच्या वेगवेगळ्या शाखा होत्या. मात्र त्यांच्यात परस्पर काही संबंध होता किंवा नाही याचा अद्याप संदर्भ मिळावयाचा आहे.

'ग्रामकुट' हा जसा ग्रामप्रमुख तसेच 'राष्ट्रकुट' हा राष्ट्रप्रमुख व प्रशासक असावा, असे मत डॉ. हरिहर ठोसर यांनी साधार पुरावे देऊन स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. याच राष्ट्रकुटांच्या मूळ स्थानाविषयी विद्वानांत मतभिन्नता आहे. दंतीदुर्ग याची माहिती तेरखेडा आणि मुलताई येथील ताम्रपटांवरुन ज्ञात झाली असून 'लट्टलूर' म्हणजेच आजचे लातूर हे राष्ट्रकुट घराण्याचे मूळ स्थान असल्याचा उल्लेख मिळतो. राष्ट्रकुट हे मूळ 'लतलूर' (मराठवाड्यातील लातूर) चे रहिवासी असून हा मूळ 'कन्नड वंश' आहे, असे मत आळतेकर यांनी नोंदविले आहे.[१] लातूरचे मूळ नाव 'रत्नापूर' होते. पुढे त्याचे नाव 'लत्तलूरपूर' असे झाले. सौदंतीच्या रट्ट्याच्या एका शिलालेखात राष्ट्रकुटसम्राट कृष्ण तिसरा याचा उल्लेख 'लत्तलूरपूरवराधिश्वर' असा आला आहे.[२] हे 'लत्तलूरपूर' म्हणजेच आजचे लातूर

होय. वेरूळ येथील दशावतार लेणीच्या पायथ्याशी असलेल्या शिलालेखात राष्ट्रकुट घराण्याची सुरूवात 'दंतीवर्मा' या मुळ पुरूषापासून दर्शविण्यात आलेली आहे. मालखेडचे राष्ट्रकुट राजे स्वत:ला लातूरचे रहिवासी समजतात. 'लट्टालूर' म्हणजे पूर्वीच्या उस्मानाबाद जिल्ह्यातील आधुनिक 'लातूर' हे नगर होय.[३] लातूर हे 'रट्टा' व 'राष्ट्रकुटांचे' मूळ निवासस्थान होते. कारण राष्ट्रकुट राजा अमोघवर्ष पहिला हा लत्तलूर नगराचा स्वामी व नगर निर्माता म्हणून उल्लेख सापडतो.[४] हे नगर मांजरा नदीच्या तीरावर होते. (रत्नापूर माहात्म्य). ग. ह. खरे यांनी 'लत्तलूर' किंवा 'लत्तनौर' ही 'रट्टनौर' या कानडी नावाची तद्‌भव रूपे असल्याचे पटवून दिले आहे. राष्ट्रकुट घराण्याचा पहिला राजा दंतीदुर्ग याने कर्नाटक, महाराष्ट्र व गुजरात जिंकलेला होता.[५] यावरून लातूर जिल्हा पूर्णपणे राष्ट्रकुट सत्तेखाली होता, याला सबळ पुरावा मिळतो. राष्ट्रकुटांचे मूळ वसतिस्थान 'लातूरच' असून पुढे या वंशातील काही महत्त्वाकांक्षी व्यक्ती नशीब अजमावण्यासाठी इतर प्रांतांत गेल्याचे इतिहासावरून ज्ञात होते. दंतीदुर्गापूर्वी राष्ट्रकुट घराण्यात पाच राजे होऊन गेले. त्यांपैकी कर्क पहिला व इंद्र दुसरा यांच्या कारकीर्दीत व्हाडातील 'इलिचपूर' ही राष्ट्रकुटांची राजधानी होती. 'एलारपूर' पुढे 'वेरूळ' या नगरास राष्ट्रकुट राजा दंतीदुर्ग याने आपल्या राज्याची राजधानी बनविले.[६] पुढे कृष्ण राजा पहिला याने 'कंधार' नगरात आपली राजधानी नेली. बीदर जिल्ह्यातील म्हणजेच लातूरलगतच असलेली 'मयुरखिंडी' आजचे 'मोरखंडी' हे नगर राष्ट्रकुटांची राजधानी बनली. आजही शिरूर अनंतपाळ तालुक्यातील नागेशवाडी या गावातच 'मोरखंडे' आडनावाची बरीच कुटुंबे वस्ती करून राहतात. ते मूळ मोरखंडीचे असावेत. 'मयुरखंडी' राजधानी असतानाच्या काळातही लातूर जिल्ह्यावर राष्ट्रकुटांचीच सत्ता होती हे साधार सांगता येते. पुढे अमोघवर्ष पहिला याने 'मान्यखेट' (मालखेडा) या नगराची निर्मिती करून येथे आपली राजधानी स्थापन केली.[७] सोलापूरच्या आग्नेय दिशेला ९० मैलांवर असलेले व कर्नाटकातील गुलबर्गा जिल्ह्यापासून २२ मैलांवरील कोयना वेण्णीतोरा या नद्यांच्या संगमापाशी वसलेले 'मान्यखेट' हे नगर कानडी प्रदेशात असून त्याची भाषाही कानडी आहे. त्याचे कोरीव लेखही कानडी भाषेत मिळतात. यावरून राष्ट्रकुट घराणे कर्नाटकातील असावे.



परंतु हे असे नसून ते आधी कर्नाटकाच्या बाहेरील होते. पुढे त्यांनी कर्नाटक जिंकून घेतला. तेथे ते वस्ती करून राहिले. त्यांनी कानडी भाषेचा स्वीकार केला तरी ते मूळ वसतिस्थान 'लातूरला' विसरले नाहीत. हे तेथील राष्ट्रकुटांनी धारण केलेल्या 'लत्तलूरपूरवराधिश्वर' या बिरूदावरून दिसून येते.

सीतावर्डी येथील लेखात 'धाडीभंडक' या राष्ट्रकुट राजाला व त्याचा अधिकारी वासुदेवाला 'लत्तलौरविनिर्गत' हे विशेषण लावलेले आहे. 'लत्तलौरविनिर्गत' म्हणजे लातूर सोडून आलेले तसेच सौंदत्तीचे रट्ट हे आपण लातूरहून 'सौदंत्तीला' आल्याचे आपल्या लिखाणात उल्लेखितात.[८] राष्ट्रकुट वंश मूळ लातूरचाच होता याला आणखीन संदर्भ म्हणजे राष्ट्रकुट-कालीन कलावैभवाची साक्ष देणारी अनेक शिल्पे. भग्नावशेष सिद्धेश्वर मंदिराच्या परिसरात विखुरलेल्या अवस्थेत सापडतात. यावरून राष्ट्रकुट वंश मूळचा लातूरचा असल्याचे आज सर्वमान्य झाले आहे.

लातूर हे नगर राष्ट्रकुट काळात 'रट्टनौरे' या नावाने ओळखले जात होते तर 'निळ्ळंद' व 'शिरूर' येथील लेखात 'लत्तलूर' असे लातूरचे नाव आलेले आहे. यावरून लातूर नगर व परिसर राष्ट्रकुट काळात भरभराटीला आला होता असे दिसते. हा भाग कर्नाटक लगत असल्यामुळे तेथील लोक लातूरच्या बाजारपेठेत येत असावेत. हे प्राचीन नगर व्यापारासाठी प्रसिद्ध होते असे दिसते. यावरून असा निष्कर्ष काढता येतो की, राष्ट्रकुटांची मूळ भूमी आताचे 'लातूर' असून येथून पुढे 'राष्ट्रकुटांनी' आपल्या सत्तेचा व भूभागाचा विस्तार घडवून आणला. लातूर, एलिचपूर, वेरूळ (एलापूर व एलुरा), कंधार, मयुरखिंड आजचे मोरखंडी व मान्यखेड या त्यांच्या एकापाठोपाठ एक बदललेल्या राजधान्यांची नगरे असल्याचे इतिहासावरून ज्ञात होते. ही नगरे लातूरच्या जवळपास असल्यामुळे राष्ट्रकुटांची सत्ता या भागावर राहिलेली होती. कंधार, धारूर, लातूर, तेर, पैठण, धर्मापुरी ही राष्ट्रकुट काळातील महत्त्वाची नागरी केंद्रे होत.[९] लातूरच्या राजकुलांनी सव्वादोनशे वर्षांची दीर्घ कारकीर्द गाजविली. राष्ट्रकुटांचे अनेक शिलालेख आणि ताम्रपट मिळालेले आहेत. कंधारचा शिलालेख हा एक सविस्तर दस्तावेज असून एक हजार वर्षांपूर्वीचे

शिलालेख 'कंधारपूरवर' असे होते. याचे सविस्तर वर्णन त्यात करण्यात आलेले आहे.[९] तसेच राष्ट्रकुटांचा संदर्भ देणारा शिलालेख 'श्री पापविनाश मंदिरात' आहे. त्यात लातूरचा 'लत्तलूर' असा उल्लेख आलेला आहे. पहिल्या अमोघवर्षाच्या 'शिरूर' आणि 'नीलगुंद' ताम्रपटातून 'लत्तालूर' हे एक उत्तम नगर असल्याचा उल्लेख मिळतो.

वरील सर्व पुराव्यांवरून राष्ट्रकुट मूळ लातूरचाच असून त्याच्या काळात लातूर व परिसर भरभराटीला आल्याचे सर्वमान्य झाले आहे तसेच राष्ट्रकुटांनी आपली राजधानी जरी बदलली असली तरी ते मूळ लातूरचे असल्याचा उल्लेख वेळोवेळी आपल्या दानपत्रात, शिलालेखात करताना दिसून येतात. वरील विवेचनावरून 'राष्ट्रकुट' मूळचे 'लातूरचें' होते त्यांची सत्ता लातूर परिसरावर सुरुवातीपासून राष्ट्रकुट सत्तेच्या अस्तापर्यंत होती हे स्पष्ट होते.

**निष्कर्ष :-**

(१) 'लत्तलूरपूर' म्हणजे आजचे लातूरच होय.

(२) मालखेडचे राष्ट्रकुट राजे स्वत:ला लातूरचे रहिवासी समजतात.

(३) लातूर हे 'रट्टा वा राष्ट्रकुटांचे मूळ निवासस्थान होते. कारण राष्ट्रकुट राजा अमोघवर्ष पहिला हा 'लत्तलूर' नगराचा स्वामी व नगर निर्माता म्हणून उल्लेख सापडतो.

(४) खरे ग.ह. यांनी ही 'लत्तलूर' किंवा 'लत्तनौर' हा 'रट्टनौर' या कानडी नावाची तद्‌भव रूपे असल्याचे पटवून दिले आहे.

(५) सौदंतीच्या 'रट्टाच्या' एका शिलालेखात राष्ट्रकुटसम्राट कृष्ण तिसरा यांचा उल्लेख 'लत्तलूरपूरवराधिश्वर' असा आला आहे. यावरून राष्ट्रकुट लातूरचे रहिवासी असल्याचे स्पष्ट होते.

(६) राष्ट्रकुट घराण्याचा राजा दंतीदुर्ग याने कर्नाटक, महाराष्ट्र व गुजरात जिंकले होते यावरून लातूर व लातूर परिसर राष्ट्रकुट सत्तेखाली होते.

(७) सीताबर्डी येथील लेखात 'धाडीभंडक' या राष्ट्रकुट राजाला व त्याच्या अधिकारी वासुदेवाला 'लत्तलौरविनिर्गत' म्हणजे लातूर सोडून आलेले.



**संदर्भ :-**

(१) आळतेकर ए. एस., राष्ट्रकुटस् अँड देअर टाईम्स, ओरिएंटल बुक्स एजन्सी, पुना, १९६७, पृ. २२-२३.

(२) कठारे अनिल, दळवे, राष्ट्रकुटांची राजधानी कंधार, कल्पना प्रकाशन, नांदेड, २००५, पृ. १७.

(३) Government of Karn atka, Karnatka State Gazetter Part-1, Chief Editor Surryanath U. Kamath, P. 238.

(४) Osmanabad District Gazetteer, 1972, P. 23-27.

(५) राजन अमिताभ, गाडगीळ, देव (संपा.), स्थानिक इतिहास आणि साहित्य एक शोध, नांदेड, १९८६, पृ. १०.

(६) पाठक अ. शं. (संपा.), महाराष्ट्र गॅझेटियर, इतिहास, प्राचीन काळ, खंड-१, मुंबई, दार्शनिक विभाग, महाराष्ट्र शासन, २००२, पृ. ३३२.

(७) Tripathi R. S., History of Ancient India, Delhi, Motilal Baharsidesh, 1967, P. 410.

(८) रोडे सोमनाथ (संपा.), निवडक शोध निबंध, मराठवाडा इतिहास परिषद, औरंगाबाद, खंड - दुसरा, पृ. १३५.

(९) काळे भगवान (संपा.), मराठवाडा काल आणि आज (पूर्वार्ध), संकेत प्रकाशन, जालना, १९८६, पृ. १९.

○○○

"शील, प्रज्ञा आणि करूणा या तत्त्वत्रयीत
अवघ्या धर्मविचारांचे सार सामावले आहे."

- भगवान बुद्ध